

"सब्बे संखारा दुक्खा"ती, यदा पञ्ञाय पस्सती |
अथ निब्बिन्दती दुक्खे, एस मग्गो विसुद्धिया ||



Regd. No. E-723(BLD)

सद्धम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा ट्रस्ट द्वारा संचालित

# सद्धम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण केन्द्र

## लोणवाडी (धरण), ता.- नांदुरा, जि. - बुलडाणा, महाराष्ट्र राज्य



12A No. AAYTS0226QE20221, 80G No. AAYTS0226QF20221, Niti Aayog No. MH/2023/0337994, CSR No. CSR00052254
PAN No. AAYTS0226Q, A/c No. 39190343348(IFSC: SBIN00002166), GPayNo. 9765020636, Phone Pay No. 9607567449

सर्व बहुजन व बौद्ध उपासक - उपासिका, बंधु भगिनी आणि विपश्यी साधक यानां सप्रेम जयभिम नमो बुध्दाय... !

आज आपल्यास ६० वर्षे झाले बौध्द धम्म स्विकारुन तरीही आपण स्वतःला बौध्द म्हणून समाजापुढे आदर्श निर्माण केला नाही. कारण कुठलाही धर्म जेव्हा वाढतो तेव्हा त्या लोकांना पाहुन, त्यांचे अनुकरण करुन लोक तो धर्म स्विकारतात.

पण आजही आपले (काही लोक अपवाद आहेत) लोक हिंदु धर्माच्या चालीरिती प्रमाणे नवस, उपवास, व्रत वैकल्प, जत्रा मध्ये सहभागी होत आहेत. एवढेच नाहीतर गणपती, दुर्गा, देवी घरात बसवितात, विक्तु बाबा, साईबाबा, गुणवंत बाबा, कान्होळ माय, मरी माय, माती पाण्याचा देव, डोंब्या गिर, पिर, सैलानी इतर कर्मकांड जर आपला समाज मानत असेल तर (बौध्द सोडून) इतर समाजाने आपल्याकडून (बौध्दांकडून) काय आदर्श घ्यावा. समाजामध्ये जेव्हा मृत्यु होतो, सर्व लोक बौध्द धर्माप्रमाणे बुध्द पुजापाठ करतात. पण तेच अमावस्या आली की, अवस मिळविणे हे घरातील मंडळी, मयताचे नातेवाईक जेवणाचे पात्र बनवून मेनबत्ती, अगरबत्ती लावतात. हे कशासाठी? आपण तर बौध्द आहोत. अमावस्या मिळविणे, नैवद्य दाखविणे हे अज्ञान नाही काय? आजही खेडेगावामध्ये नवरदेव हा मारोती मंदिराच्या पायरीवर आणि वेशीवर, शिवेवर सुध्दा पुजा करुन नारळ फोडतो. **बाबासाहेबांनी तर आपल्याला धर्मांतर करतेवेळी २२ प्रतिज्ञा दिल्या होत्या.** त्या आपण किती पाळतो ? पण आपल्याला बाबासाहेब दुसऱ्यांच्या घरात पाहिजेत. आपल्या घरामध्ये नाही. म्हणून समाज बाबासाहेबांना मानतो पण बाबासाहेबांचे विचार मानीत नाहीत. फक्त महापुरुषांच्या जयंती पुरतेच बाबासाहेबाला मानतात. याचे कारण फक्त अज्ञान आहे. १४ एप्रिल बाबासाहेबांची जयंती त्या दिवशी फक्त निळे, पांढरे कपडे नेसून डी.जे. पुढे नाचून, काही जण दारु पिऊन जयंती साजरी करतात आणि १५ एप्रिल पासून सर्व कोमात जातात. आपल्या गावात तर कोणी ज्ञानी व्यक्ती किंवा भंतेजी आले तर, त्यांच्या प्रबोदधनाला किती टक्के लोक असतात? बर कोणते लोक जातात? ज्यांना बाबासाहेब, बुद्धाविषयी आदर आहे तेच लोक प्रबोधनाला जातात. तेही १० ते १५ टक्के लोक. पण ८५ टक्के लोक घरी असतात आणि दारु पिऊन किंवा आपल्या संसारात मस्त असतात. खऱ्या अर्थाने त्या ८५ टक्के लोकांना ज्ञानाची गरज आहे. **त्यांच्यासाठी आपल्याकडे काय पर्याय आहे ?**

आपले मुलं टि.व्ही. मोबाईलमध्ये एवढे गुरफटलेले आहेत की, ते चित्रपट, नाटके, क्रिकेट, गाणे यांच्यामध्ये दंग आहेत. यात स्त्री व पुरुष सुध्दा आहेत. याच्या आहारी गेल्यामुळे त्या लोकांना धम्म संस्कार काय आहेत हे माहिती नाही. **पण त्यांच्यासाठी आपण धम्म संस्काराचे काही नियोजन केले आहे काय?**

आपल्या समाजाला मनोरंजनाची फार आवड निर्माण झाली आहे. ड . बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते की, माझे १० भाषणे पण प्रबोधन कारांचे एकच गाणे परिवर्तन घडवू शकते. पण आपले गायक कलाकार यांचे एवढे भाव वाढले आहे की, एका कार्यक्रमाचे लाख लाख रुपये घेऊन समाज परिवर्तनाचे प्रबोधन करतात. तेही ४ तासात यावर एवढा मोठा खर्च करुन किती टक्के लोकाचे परिवर्तीत झाले. फक्तलोक येतात मनोरंजन करण्याकरीता आणि गर्दी करण्याकरीता. **आपले आंबेडकरी वर्तमानपत्र आहेत किती लोक पेपर वाचतात? किती लोकांना वर्तमान पत्रातून प्रबोधन झाले? आणि किती टक्के लोक परिवर्तनवादी बनले ?**

**आपल्या समाजाचे टि.व्ही. चॅनेल सुरु झाले, किती टक्के लोक टि.व्ही. चे आपले चॅनल पाहतात आणि काय परिवर्तन झाले? काही भंतेजींनी यु-ट्युब चॅनल सुरु केले आहे पण किती लोक पाहतात? किती टक्के लोक वरील सर्व गोष्टींमध्ये सहभागी आहेत. समाजाचे कार्यकर्ते वर्गणी गोळा करुन मोठे गायक, आर्केस्ट्रा, डी.जे. लावून लोकांची डिमांड पूर्ण करतात आणि गर्दी जमा करतात. आम्ही ह्या गोष्टीला विरोध करत नाही, पण ह्याच्या पासून समाजाचा काय फायदा झाला याचा विचार करावा.**

**आपण जर प्रबोधन शिबीरे लावले किंवा प्रबोधन प्रशिक्षण केंद्रे उभे केले, तर येणाऱ्या आपल्या भावी पिढीचे भविष्य उज्वल नाही का होणार आहे**

सरकारी कर्मचारी, शिपाई ते क्लास वन अधिकारी यामधील काही अपवाद सोडल्यास जय भिम म्हणायला लाजतात. कारण त्यांना त्यांच्या धम्माविषयी कमीपणा वाटतो. पण ते विसरलेत की तुम्हाला जे शिक्षण मिळाले ते १८४८ रोजी बहुजनांसाठी म. फुलेंनी पहिली शाळा सुरु करुन शिक्षण मिळवून दिले. तुम्हाला जी नोकरी (संपत्ती) मिळाली ते १९०२ रोजी शाहु महाराजांनी आरक्षण दिल्यामुळे मिळाली. १९५० रोजी तुम्हाला सर्व न्याय, हक्क, स्वतंत्रा जे बहाल केली ते बाबासाहेबांच्या संविधानामुळे व १९५६ रोजी नविन असा विज्ञानवादी बौध्द धम्म दिला. या सर्व १०८ वर्षाचा संघर्षामुळे समाज शिक्षित व आरक्षित झाला, परंतु अधिकारी व नोकरवर्ग हा संघर्ष विसरलेला आहे. बंगला, गाडी, पत्नि, मुले, संपत्ती यामध्येच व्यस्त आहे, समाजाचे काही देणे-घेणे नाही, याचे कारण फक्तअज्ञान आहे. मग ते अज्ञान कसे दूर होईल ?

आज आपण ड . बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामुळे मान-सन्मानाचे जीवन जगत आहोत. खऱ्या अर्थाने बाबासाहेबांनी संविधान लिहून सर्व मानव जातीला न्याय, स्वतंत्रा, समता, न्याय, बंधुत्व, अधिकार बहाल केले. एवढेच नव्हे तर भारतातील सर्व पशु, पक्षी, झाडे, नदी, नाले या धरतीवरील सर्व घटकांना संविधानातून न्याय दिला. आपल्याला तर खुप मोलाचा असा बौध्द धम्म दिला. **बौध्द असणे म्हणजेच जय भिम म्हणणे आहे का? बौध्द असणे म्हणजेच दिक्षाभुमीवर जाणे, बौध्द असणे म्हणजेच चौत्यभुमीवर जाणे, बौध्दगया येथे जाणे, महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करणे एवढेच फक्तबौध्दाचे कार्य आहेत काय ?**

अजुनही आपल्या समाजाला मान-सन्मान नाही. आता ही आपल्या समाजावर, महिलांवर अन्याय, अत्याचार होत आहेत. अजूनही आपली शासनकर्ती जमात झालेली नाही. आजही आपल्यातील अंधश्रध्दा गेलेली नाही. याचे एकमेव कारण फक्त अज्ञान आहे. अज्ञान असल्यामुळे आपण आपला स्वाभिमान गमावतो. स्वाभिमान म्हणजे काय, माहित नाही म्हणून आपण उच्चवर्गीयांची हुजरेगिरी करतो, मत विकतो, कोणी जर त्याच्याप्रमाणे कार्य करत असेल तर त्याला विरोध करतो. घरातील लोकांना समजुन घेत नाहीत, समाजाला समजुन घेत नाहीत, दारु पिणे, खोटे बोलणे, लबाडी करणे, गुटखा, तंबाखु खाणे, सिगरेट, बिडी ओढणे, गांजा ओढणे, व्यभिचार करणे, लोकांना कमी समजणे, उच्च पदावर असलेले शिक्षीत लोक बाबासाहेबांना विसरले म्हणूनच ते धर्म (धम्म) लपवतात. भिक्खुबद्दल आदर नसणे, हे सर्व अज्ञानामुळे घडत आहे. त्यामुळे आपल्या मुलांवर चांगले संस्कार होत नाही. म्हणून जसा बाप तसा बेटा.

आपला बाप तर विश्वरत्न, बोधिसत्व, ज्ञानी महापुरुष होते. तर आपणही ज्ञानी असायला हवं, पण आपण तसे नाही. कारण फक्त अज्ञान आहे. कारण समाजाचे प्रबोधन झालेले नाही.

आज आपण पाहतो की, भंतेजीची संख्या वाढलेली आहे. आम्ही त्यांच्यावर दोषारोपण करणार नाही. पण बौध्द उपासक म्हणून आपलीही काही जबाबदारी आहे. म्हणून बौध्द भिक्खु बुध्दाने सांगितल्याप्रमाणे भ्रमण करुन लोकांना अज्ञानापासून दूर करावे, पण तसे होतांना दिसत नाही. दुःखमुक्तीचा मार्ग सांगणे, मानवाला दुःखमुक्तकरणे हे भंतेजींचे कार्य असले पाहिजे. (काही भंतेजी वंदनीय आहेत.) भंतेजींचे कार्य म्हटले की, प्रत्येक भंतेजीची धम्मकुटी झाली पाहिजे, म्हणून दान मागतात, विहारासाठी दान मागतात. लग्न समारंभामध्ये, अंतिम संस्कार मध्ये आवर्जुन भाग घेतात हे सर्व अज्ञान नाही काय?

**म्हणूनच वरील गोष्टींचे अज्ञान दूर करण्यासाठी आम्ही सद् धम्मप्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा केंद्र निर्माण करीत आहोत. हे लोणवाडी येथे धरणाच्या पायथ्याशी निसर्गरम्य ठिकाणी आपल्या सहकार्यातून निर्माण करीत आहोत.**

**या प्रशिक्षण केंद्रासाठी संतोष भिमराव तायडे यांनी खडदगांव ता.नदुरा जि. बुलडाणा शिवारात गट नं. ३२८ मधील ०.८१ आर जमीन दान दिली आहे.**

सद्धम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण केंद्र हे दोन भागांमध्ये विभागलेले आहे. ते खालीलप्रमाणे :-


**१) सद्धम्म प्रबोधन (फेस-१) :-** यामध्ये ५०० लोकांसाठी प्रबोधन शिबीर घेण्यासाठी प्रबोधन हॉल निर्माण करीत आहोत. ५०० लोकांच्या राहण्याची, जेवणाची सर्व व्यवस्था केली जाणार आहे. हे प्रबोधन शिबीर पाच दिवसांचे राहील. यामध्ये तज्ञ लोकांकडून मार्गदर्शन होईल. पहिल्या दिवशी सामाजिक विषय राहील. दुसऱ्या दिवशी आर्थिक विषय राहील. तिसऱ्या दिवशी राजकीय विषय राहील. चौथ्या दिवशी धम्मावर प्रवचन होईल. यामध्ये पंचशील, दसपारमिता, विपश्यना मधील कायानुपश्यना, वेदनुपश्यना, धम्मानुपश्यना हे सर्व शिकविल्या जाईल. पाचव्या दिवशी जीवन कौशल्य (लाईफ स्कील) जीवन जगण्याची कला शिकविल्या जाईल. प्रत्येक तालुक्यातून साठ गावांमधून ३०० लोकांनाच प्रवेश मिळेल. प्रत्येक गावामधून पाच लोक येतील अशी अपेक्षा आहे.

**२) तक्षशिला विपश्यना ध्यान साधना (फेस-२) :-** यामध्ये विपश्यना साधना करण्यासाठी ५०० लोक ध्यान करु शकतील, असा भव्य पॅगोडा निर्माण करीत आहोत. वरील पाच दिवस शिबीर केल्यास त्यांना विपश्यना करण्याकरीता प्राधान्यक्रम देण्यात येईल. जे भिक्खु विपश्यना करण्यासाठी येतील त्यांच्यासाठी वेगळी इमारत राहील. त्यामध्ये राहण्याची, झोपण्याची व्यवस्था राहील. वर्षावास काळात भिक्खुंसाठी वेगळी व्यवस्था करण्यात येईल. यामध्ये दोन महिने महाथेरो अरहंत यांच्याकडून प्रवचन धम्मदेसना देण्यात येईल व दोन महिने विपश्यना ध्यान असिस्टंट आचार्यकडून शिकविल्या जाईल. पॅगोडा मध्ये १०, २०, ३०, ४५ दिवसीय विपश्यना ध्यान शिबीर होईल. सतिपठ्ठाण हे शिकविल्या जाईल. ध्यान विपश्यनातून कायानुपश्यना, चित्तानुपश्यना, वेदनानुपश्यना, धम्मानुपश्यना हे सर्व शिकविल्यानंतर त्यांना क्रमानुसार स्त्रोतापन्न सकदागामी, अनागामी, अरहंत पर्यंत ज्ञान प्राप्त करुन घेता येईल.

पुढे ॲम्बुलन्स व २ बसेस सामील करावयाच्या आहेत. असे **सद्धम्म प्रबोधन आणि विपश्यना केंद्र प्रत्येक जिल्ह्यामध्ये निर्माण करण्याचा हेतू आहे.** तरी आपण समाजाचे देणे लागतो या उद्देशाने तन-मन-धनाने सहकार्य करावे, हीच अपेक्षा.


## संस्थेचे प्रमाणपत्र

1) नोंदणी प्रमाणपत्र




नोंदणीचे प्रमाणपत्र

2) 12 A प्रमाणपत्र




FORM NO. 10AC

3) 80 G प्रमाणपत्र




FORM NO. 10AC

4) निती आयोग प्रमाणपत्र



Registeration Progress

5) CSR प्रमाणपत्र



GOVERNMENT OF INDIA
MINISTRY OF CORPORATE AFFAIRS
OFFICE OF THE REGISTRAR OF COMPANIES

Dated : 22-04-2023

NOTE - THIS LETTER IS ONLY AN APPROVAL FOR REGISTRATION OF THE ENTITIES FOR UNDERTAKING CSR ACTIVITIES.

To,
SADDHAMA PRABODHAN ANI VIPASHYANA PRASHIKSHAN SEVA TRUST , AT LONWADI,TALUKA NANDURA,DISTRICT BULDHANA,MH08,MH,443404

PAN : AAYTS0226Q

**Subject:** In Reference to Registration of Entities for undertaking CSR activities
**Reference:** Your application dated 22-04-2023 (SRN-F60657400)


Sir/Madam,

With reference to the above, it is informed that the entity has been registered for undertaking CSR activities and the Registration number is CSR00052254. Please refer the registration number for any further communication.

Registrar of Companies
ROC-DELHI

**Note:** The corresponding form has been approved and this letter has been digitally signed through a system generated digital signature.

6) बँक अकाउंट नंबर SBI





7) संस्थेचे पॅन कार्ड



आयकर विभाग भारत सरकार
INCOME TAX DEPARTMENT GOVT. OF INDIA
स्थायी लेखा संख्या कार्ड
Permanent Account Number Card
AAYTS0226Q
नाम / Name
SADDHAMA PRABODAN ANI VIPASHAYANA PRASHIKSHAN SEVA TRUST
18062019
निगमन / गठन की तारीख
Date of Incorporation/Formation
30/07/2018

8) संस्थेचे 7/12 व 8-अ






# सद्धम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा ट्रस्ट

## कार्यकारणी

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| 01. | संतोष तायडे | अध्यक्ष |
| 02. | माणिक तायडे | उपाध्यक्ष |
| 03. | किशोर इंगळे | सचिव |
| 04. | राजरत्न हिवराळे | कोषाध्यक्ष |
| 05. | राजेश इंगळे | सहसचिव |
| 06. | मुकेश तायडे | सदस्य |
| 07. | कल्पना इंगळे | सदस्या |
| 08. | रेखा इंगळे | सदस्या |
| 09. | साधना तायडे | सदस्या |

## फेस-1 : नालंदा



1) सांची गेट :- निर्माण करीता आपणही दान देऊ शकता.



2) प्रबोधन हॉल :- 500 लोकांसाठी पाच दिवसाचे प्रबोधनामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, जीवन जगण्याची कला या विषयावर प्रबोधन होईल.



3) स्पर्धा परीक्षा वर्ग :- समाजातील गरीब, हुशार, होतकरु मुला-मुलींकरीता स्पर्धा परीक्षा वर्ग निर्माण करण्यात येईल.



4) कॉम्प्युटर + ग्रंथालय :- कॉम्प्युटर रुम तसेच ग्रंथालयामध्ये नवीन ग्रंथातील ज्ञान संपादन करीता उपलब्ध करुन देण्यात येतील.



5) **व्यसनमुक्ती केंद्र :-** आपल्या समाजामध्ये बरेच लोक हे व्यसनाधिन झालेले आहेत. आपली तरुण पिढी सुध्दा व्यसनाकडे वळले आहे. त्याकरीता व्यसन समुळ नष्ट व्हावे याकरीता व्यसनमुक्ती केंद्र निर्माण करीत आहोत.



*7) **कार्यालय :-** येणाऱ्या सर्व प्रबोधन शिबीरार्थीचे नाव नोंदणे, विपश्यी साधकाचे नाव नोंदणे, सर्व प्रशिक्षण केंद्राचा लेखाजोखा ठेवणे करीता कार्यालय निर्माण करीत आहोत.*



6) **पालीभाषा अभ्यासिका :-** बौध्द धम्माचे संपूर्ण ज्ञान हे पाली भाषामध्ये आहे. म्हणून पालीभाषाआपल्याला अवगत असावी. म्हणून पाली भाषा शिकवण वर्ग निर्माण करीत आहोत.



*8) **अनाथालय :-** ज्या मुलांचे आई-वडिल नाही, त्यांना सोडून गेले अस्या मुलांसाठी आपण अनाथालय निर्माण करीत आहोत.*



*9) **वसतीगृह :-** ज्या मुलांना शिक्षणाची आवड आहे परंतु काही कारणास्तव शहरात शिक्षण घेता येत नाही अशा मुला-मुलींकरीता वसतीगृह निर्माण करीत आहोत.*



*10) **वृध्दाश्रम :-** चळवळीत काम करत असतांना घराकडे दुर्लक्ष होते, त्यामुळे काही मुले आपल्या आई-वडिलांचा सांभाळ करीत नाही. त्या वृध्द माता-पितांचे संगोपनाची जबाबदारी आम्ही घेत आहोत.*



*11) **स्वयंपाकगृह / भोजन कक्ष :-** शिबीरार्थी व इतर लोकांची भोजनाची व्यवस्था व्हावी,याकरीता स्वयंपाकगृह/ भोजन कक्षाची निर्मिती करीत आहोत.*



*12) **दवाखाना :-** प्रशिक्षण केंद्रामधील किंवा गरीब लोकांकरीता विनामुल्य आरोग्य सेवा उपचार देण्याकरीता दवाखाना निर्माण करीत आहे.*





*13) **प्रबोधन शिबीरार्थीना राहण्यासाठी इमारत :-** 450 लोकांना 5 दिवस राहण्याकरीता निवासस्थान निर्माण करीत आहोत.*



*14) **आजारी व वृध्द भिक्खुसाठी निवास :-** आजारी व वृध्द भिक्खुनि / भंतेजींचे संपूर्ण संगोपन करण्यासाठी निवासस्थान निर्माण करीत आहोत.*



***फेस-2 : तक्षशीला***

*1) **पॅगोडा :-** 500 विपश्यी साधक कायानु विपश्यना, वेदनानु विपश्यना, चित्तानु विपश्यना, धम्मानु विपश्यना याद्वारे ध्यान साधना करु शकतील असा भव्य पॅगोडा निर्माण करीत आहोत.*



*2) **आचार्य निवास :-** विपश्यी साधकांना प्रशिक्षण देण्यासाठी आलेल्या आचार्य यांचे निवासस्थान निर्माण करीत आहोत.*



३) **विपश्यी / भिक्खु साठी निवास :-** विपश्यनासाठी येणाऱ्यासाठी राहण्याकरीता स्वतंत्र अशी निवासस्थान निर्माण करीत आहोत.



*४) **स्वयंपाकगृह / भोजन हॉल :-** विपश्यी साधक व भिक्खुसाठी भोजन दानाची व्यवस्था करण्यात येईल.*



*५) **विपश्यी साधकांसाठी राहण्याची इमारत :-** जे विपश्यी साधक 10, 20, 30 दिवस ध्यान साधना करणार आहेत, त्यांच्याकरीता निवासस्थान निर्माण करीत आहोत.*





६) **पार्कींग :-** वाहन तळ

***आपण आपल्या परीने वरील दर्शविलेल्या वास्तुला दान देवून पुण्य संपादन करुन घ्यावे व आपले किंवा प्रियजनांचे नांव सुवर्ण अक्षरामध्ये त्या वास्तुवर कोरण्यात येईल.***

# सन 2015 पासून आजपर्यंत संस्थेने केलेल्या कार्याचा आढावा.

## 1) धम्म मेळावा विषय : सदधम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा केंद्राच्या साठी भूमिपुजन तसेच तालुक्यातील बौध्द सरपंच, उपसरपंच यांना सन्मानपत्र देवून त्यांचा सत्कार.



नमो बुध्दाय !! अत्त ! दिप !! भव !!! जय भिम

**सदधम्म प्रबोधन आणि विपश्यना बहुउद्देशिया प्रशिक्षण केंद्र**
लोनवाडी(डॅम), ता.नांदुरा, जि.बुलडाणा.

**धम्म मेळावा**

सदधम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण केंद्राचे भुमिपुजन तसेच नांदुरा तालुक्यातील बौध्द समाजातील सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं.सदस्य यांचा सन्मान पत्र देऊन जाहीर सत्कार.

**-: निमंत्रण पत्रिका :-**

आयु.________________ सप्रेम जय भिम.

उपासक आणि उपासिका यांना कळविण्यात आनंद होतो की, आपल्या बुलडाणा जिल्ह्यात प्रथमच लोनवाडी येथे, प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण केंद्र, निर्माण होत आहे. सामाजीक बांधीलकी, बौध्द संस्कृती, समाजातील अज्ञान दूर करण्यासाठी या प्रशिक्षण केंद्राची निर्मिती करण्याचे ठरविले आहे.

**कार्यक्रमाचे उद्‌धाटक : भन्ते - प्रज्ञा रश्मी महाथेरो,** तांदुळवाडी
**भुमिपूजन : भन्ते- विनयपाल थेरो, शेगांव.**
**प्रमुख मार्गदर्शक : भन्ते बुध्द किर्ती, भन्ते धम्मरक्षित** (गुजरात),
**भन्ते अमर दिप जालना, रेवत भन्ते** चिखली, **अभय पुत्र** (जांभाई मंगरुळपीर)

**दिनांक : १४/१०/२०१५ रविवार स्थळ : लोणवाडी (धरण) (आमचे शेत मळ्यात)**

२८/१०/२०१५ **कार्यक्रमाची रुपरेषा :**

सकाळी :८.०० वा. बुध्द वंदना हस्ते बौध्दाचार्य - एम.एम. तायडे(मुंबई)
१२.०० वा. प्रबोधन व विपश्यना केंद्राचे भूमिपूजन
१.०० वा. ग्रामपंचायत सरपंच सदस्य, सत्कार समारंभ
३.०० वा. भोजनदान

प्रमुख उपस्थिती :-
- **श्री.साहेबराव फासे** (मा.सरपंच तथा उपसभापती कृ.उ.बा.समिती नांदुरा)
- **श्री.सतिश फासे** (सरपंच ग्रा.पं.लोणवाडी)
- **आयु.साधनाताई संतोष तायडे** (उपसरपंच लोणवाडी)
- **सौ.नलिनीबाई प्रल्हाद फासे** (सदस्या ग्रा.पं.लोणवाडी)
- **सौ.अहिल्याबाई शंकरराव कुन्हाडे** (सदस्या ग्रा.पं.लोणवाडी)
- **आयु.माणिकराव मन्साराम तायडे मुंबई** (बौध्दाचार्य)

- विनित -
सद्‌धम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण केंद्राचे कार्यकर्ते तथा समस्त गावकरी बौध्द उपासक उपासिका, लोणवाडी.

- आयोजक -
संतोष तायडे
अध्यक्ष, सद्धम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण केंद्र, लोणवाडी ९७६५०२०६३६

टिप : कार्यक्रमाचे ठिकाण नांदुरा ते मोताळा रोडवर खडदगांव फाट्यापासुन पूर्वेस १ कि.मी. अंतर आहे. (धरणाजवळ)

### प्रमाणपत्र



!! नमो बुध्दाय !! अत्त !! दिप !! भव !! जय भिम !!

**सद्‌धम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण केंद्र**
लोणवडी (डॅम) ता.नांदुरा, जि.बुलडाणा
Rg. No. E 723 (BLD)

**● सद्‌धम्म शासक सन्मान पत्र ●**

**जय भिम**

आदरणीय अवचितराव श्रीपत वाकोडे (रा. चांदुर बिस्वा) खर्डी

आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानामुळे ग्रा.पं./पं.स./जि.प./ सदस्य पदी विराजमान झालेले आहात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे

"जा तुमच्या घराच्या भिंतीवर कोरून ठेवा की, तुम्हाला या देशाची शासनकर्ती जमात बनायचं आहे"

हे वाक्य आपण काही अंशी खरे करून दाखविले आहे. त्याबद्दल तुमचा आम्ही सन्मान करीत आहो.

तसेच पुढील राजकीय वाटचाल समाजाच्या उत्थानासाठी कल्याणासाठी कराल हिच सदिच्छा आणि अपेक्षा.

अध्यक्ष / सचिव
सद्‌धम्म प्रबोधन आणि विपश्यना बहुउद्देशीय प्रशिक्षण सेवा केंद्र लोणवाडी (डॅम) ता. नांदुरा जि.बुलडाणा

२८/१०/२०१५

अध्यक्ष / सचिव
सद्‌धम्म प्रबोधन आणि विपश्यना बहुउद्देशीय प्रशिक्षण सेवा केंद्र लोणवाडी (डॅम) ता. नांदुरा जि.बुलडाणा

## 2) प्रत्येक महापुरुषांच्या पुतळ्यासमोर CCTV कॅमेरे बसविणेबाबतचे निवेदन.

### वृत्तपत्र कात्रण



**राष्ट्रीय महापुरुषांच्या पुतळ्यांसमोर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी**

नांदूरा, दि. २० (प्रतिनिधी)- प्रत्येक गावात राष्ट्रीय महापुरुषांचे पुतळे आहेत. त्यापैकी काही पुतळ्यांना संरक्षण नाही. अशा पुतळ्यांची समाजकंटकांकडून विटंबना होण्याची शक्यता असते. त्यामुळे समाजामध्ये अशांतता निर्माण होते. विटंबना करणारा पुराव्याअभावी निर्दोष सुटतो, ... एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्ह्यातील सरकारी व निमसरकारी कार्यालयांमध्ये राष्ट्रीय महापुरुषांच्या प्रतिमा लावाव्यात, त्यामध्ये भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा प्रत्येक कार्यालयात लावणे बंधनकारक करावे, असेही ...

सम्राट दि. २१.१.१५.

## 3) धम्म प्रबोधन शिबीर दि. 16/08/2016



*9) नांदुरा रेल्वे स्टेशन येथून दिक्षाभूमी नागपूर येथे जाणाऱ्या सर्व भिमसैनिकांना धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त भव्य भोजनदानाचे वाटप. दि. 04/10/2022.*

*10) दहिगांव येथे वृध्दाश्रमाला दसऱ्या निमित्त भोजनदान. दि. 05/10/2022.*




दहिगांव येथील वृध्दाश्रमातील वृध्दांना भोजनदान दि. ०५/१०/२०२२



सदधम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा ट्रस्ट (रजि.)
लोणवाडी, ता. नांदुरा, जि. बुलढाणा द्वारा संचालित

**सदधम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा केंद्र लोणवाडी (धरण)**

*धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सर्व जनतेस मंगलमय शुभेच्छा...!*

❖ धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पुर्वसंध्येला भोजनदान ❖

आपल्या ट्रस्टच्या माध्यमातून धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पुर्वसंध्येला नांदुरा येथे भव्य भोजनदानाचे आयोजन केले आहे. आपल्या परिसरातील सर्व बौध्द उपासक / उपासिका हे नागपूर येथे दरवर्षी दिक्षाभूमीला वंदन करण्याकरीता जात असतात. त्यांच्या सोयीसाठी आम्ही भोजनदान व पाणी वाटप करणार आहोत. आपणही या कार्यक्रमाला उपस्थित राहून व आपले कुशल कर्म करुन दान पारमिता पूर्ण करावी.

❖ दिनांक ❖ ०४/१०/२०२२
❖ वेळ ❖ दुपारी १२.०० वाजेपासून
❖ स्थळ ❖ रेल्वे स्टेशन नांदुरा

*सबका मंगल हो...!*

विनीत

संतोष तायडे, अध्यक्ष
गोविंद वाघ, अध्यक्ष व्यवस्थापन समिती
सुनंदाताई नितनवरे, अध्यक्षा महिला संघ
राजेश इंगळे, सहसचिव
निवृत्ती धुरंधर, सदस्य
समाधान हेलोडे, अध्यक्ष नियोजन समिती
दिनकर वाकोडे, अध्यक्ष बांधकाम समिती
माणिक तायडे, उपाध्यक्ष
किशोर इंगळे, सचिव
सुमती तायडे, सदस्या
मुकेश तायडे, सदस्य
विनोद चव्हाण, सदस्य

*11) राहुल तायडे साहेब तहसिलदार नांदुरा यांची नियोजित जागेला भेट.*




मा. राहुलजी तायडे साहेब, तहसिलदार नांदुरा यांची सदूधम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण केंद्र लोणवाडी धरण नियोजित जागेला भेट.
दि. २२/०४/२०२२



*12) एस.एम. तायडे साहेब, दुय्यम निबंधक, मोताळा व मिर्झा साहेब, दुय्यम निबंधक, नांदुरा यांची नियोजित जागेला भेट. दि. 09/06/2022.*

मा. संतोषजी तायडे साहेब, दुयम निबंधक मोताळा, मा. मिर्झा साहेब दुयम निबंधक नांदुरा यांनी सदूधम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा केंद्र लोणवाडी धरण या नियोजित जागेला भेट दिली.
सोबत विजय तायडे, दिनकर वाकोडे व संतोष तायडे अध्यक्ष.
दि. ०९/०६/२०२२




*डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या भारतीय बौध्द महासभा या मातृसंस्थेमध्ये दि. 26/11/2017 या वर्षापासून सन 2019 पर्यंत संतोषराव तायडे लोणवाडीकर यांनी कार्य केलेले आहे.*

*आपल्या चळवळीचे प्रथमच टी.व्ही. चॅनल सुरु झाले. त्यामध्ये संतोषराव तायडे लोणवाडीकर यांनी नांदुरा व मोताळा तालुक्यामध्ये तालुका प्रतिनिधी म्हणून कार्य केलेले आहे.*



**THE BUDDHIST SOCIETY OF INDIA**
**भारतीय बौध्द महासभा**
Founder President: **Bharatratna Dr. B.R. Ambedkar**
(M.A., Ph.D., M.Sc., Barister-at-Law, D.Sc., L.L.D., D.Litt.)
Affiliated to: World Fellowship of Buddhists, Bangkok, Thailand
*Trustee - Chairman: Mr. Ashok Mukundrao Ambedkar* Mob: 8600743065
Regd.No.: 3227 Dt.04/05/1955 Registered under Societies Registration Act.1860 & No. F-982 (Bom.) Dt.06/07/1962 under The Bombay Public Trust Act. 1950

क्रमांक : 124 दिनांक : 26/11/17

**नियुक्ती पत्र**

प्रतिष्ठा में,
आयु. संतोष भिमराव तायडे मु. लोणवाडी ता. नांदुरा जि. बुलढाणा

त्रिरत्न की पवित्र भावना से हम आपकी सुखी एवं समृध्दिमय भावी जीवन की मंगल कामना करते है।

आपको सहर्ष सुचित किया जाता है की, आपकी धार्मिक एवं सामाजिक कार्यो में गहन रुचि को दृष्टिगत रखते हुए संस्था के राष्ट्रीय अध्यक्ष आयु. अशोक मुकूंदराव आंबेडकर तथा राष्ट्रीय कार्यध्यक्ष आयु. राजरत्न आंबेडकर, इनके निर्देशो के अनुसार आपको प्रदेस अध्यक्ष (प्रशासकिय पत्र व्यवहार और कानुनी कार्यवाही.) के पद पर वर्ष 2017 से लेकर वर्ष 2019 तक नियुक्त किया जाता है।

आशा और विश्वास है की, आप सत्यनिष्ठा से कार्यरत रहकर इस पद की गरीमा बनायें रखेंगे और धम्म कार्यो की प्रगती से जिला, प्रदेश और केंद्रीय कार्यालय को अवगत कराते रहेंगे।

!!! भवतु सब्ब मंगलं !!!
धम्म सेवा में,

आयु. अशोक मुकूंदराव आंबेडकर (ट्रस्टी चेअरमन - राष्ट्रीय अध्यक्ष)
आयु. राजरत्न अशोक आंबेडकर (राष्ट्रीय कार्यध्यक्ष)



**LORD BUDDHA TELEVISION**
Head off. :- Prathamesh Vihar, 3rd Floor, Flat No. 304, Near Dainik Bhasker, Great Nag Road, Ashok Chowk, Nagpur - 440 003 (M.S.) India.
Ph. : 0712 - 2740505
E-mail : lordbuddhatv@gmail.com • www. lordbuddhatv.com

दिनांक ०१/०६/२०१२

**नियुक्ती पत्र**

प्रमाणित करण्यात येते की, **संतोष भिमराव तायडे** लोणवडी पो माळेगांव गोंड, ता.नांदुरा, जि . बुलडाणा (महाराष्ट्र) यांना आज दि. ०१/०६/२०१२ (१ जुन २०१२) पासुन **लॉर्ड बुध्दा टि.व्ही** च्या करारनाम्यातील अटीच्या अधीन राहुन **नांदुरा व मोताळा तालुक्याची तालुका प्रतिनिधी** म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे. तसेच आपल्या सत्कार्यास सदिच्छा.
धन्यवाद.

लॉर्ड बुध्दा TV चॅनलचे
जिल्हा प्रतिनिधी बुलडाणा
ऑफिस :-
प्रथमेश विहार,३ ला मजला,प्लॅट नं.३०४,दैनिक भास्कर जवळ,ग्रॅट नाग रोड, अशोक चौक नागपुर,४४० ००३ (महाराष्ट्र)

भदंत ज्ञानज्योती महाथेरो हे सदधम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा ट्रस्टच्या कार्याचे अवलोकन करतांना व आशिर्वाद देतांना. सोबत संतोषराव तायडे लोणवाडीकर व देविदास गोरे.



सदधम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा केंद्राच्या नियोजित जागेला राजरत्न आंबेडकर यांच्या भेटीचे छायाचित्र.



संतोषराव तायडे लोणवाडीकर यांनी (Life Skill Education) जिवन कौशल्य जिवन जगण्याची कला हे डॉ. स्वरुप रावल कडून शिक्षण पूर्ण केले. कार्यशाळेचे छायाचित्रामध्ये डाव्या बाजूकडून 4 थ्या नंबरवर.






# सद्धम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा केंद्र

## लोणवाडी (धरण) ता. नांदुरा जि. बुलडाना

### आती महत्वाची विशेष कार्यकारणी समिती

| अ.क्र. | नांव | पद | |
|---|---|---|---|
| 1 | भदंत. राजज्योतीजी | मुख्य मार्गदर्शक | सद्धम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा केंद्र |
| 2 | भदंत. परमानंद | मार्गदर्शक | सद्धम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा केंद्र |
| 3 | भन्ते. सुर्यज्योती | अध्यक्ष | भीख्यु संघ समिती |
| 4 | भन्ते. आर्यमैत्र | अध्यक्ष | पालीभाषा अभ्यासिका समिती |
| 5 | ॲड. माणिकराव पवार | अध्यक्ष | विधी व कायदेशीर सल्लागार समिती |
| 6 | आर्कि. श्रीलेखा विद्यारूण | आर्किटेक्ट | सद्धम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा केंद्र |
| 7 | गोपाल गांवडे (C. A.) | चार्टड अकाउंटेंट | सद्धम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा ट्रस्ट |
| 8 | डॉ. प्रज्ञा. गो. वाघ | अध्यक्ष | आरोग्य नियोजन समिती |

## सदधम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा केंद्र

### विशेष कार्यकारणी समिती

| अ.क्र. | नांव | पद | समिती |
|---|---|---|---|
| १ | संतोष तायडे | अध्यक्ष | सद्धम्म प्रबोधन आणि विपश्यना प्रशिक्षण सेवा केंद्र |
| २ | गोविंद वाघ | अध्यक्ष | व्यवस्थापन समिती |
| ३ | प्रभात खिल्लारे | अध्यक्ष | प्रबोधन समिती |
| ४ | सुमती तायडे | अध्यक्ष | नियोजन समिती |
| ५ | दिनकर वाकोडे | अध्यक्ष | बांधकाम समिती |
| ६ | सुनंदाताई नितनवरे | अध्यक्ष | महिला संघ समिती |
| ७ | भिमराव कळसकर | अध्यक्ष | सुरक्षा सैनिक समिती |
| ८ | श्रीकांत गोडांने | अध्यक्ष | सल्लागार समिती |
| ९ | देविदास गोरे | अध्यक्ष | विपश्यना ध्यान समिती |
| १० | वसंता ठाकरे | अध्यक्ष | वृद्धाश्रम समिती |
| ११ | राहुल इंगोले | अध्यक्ष | स्पर्धापरीक्षा वर्ग समिती |
| १२ | गुलाब तायडे | अध्यक्ष | स्वच्छता नियोजन समिती |
| १३ | सुरेश हिवराळे | अध्यक्ष | अनाथालय समिती |
| १४ | निवृती धुरंधर | अध्यक्ष | पर्यावरण समिती |
| १५ | प्रशांत इंगळे | अध्यक्ष | खाद्य समिती |
| १६ | विनोद चव्हान | अध्यक्ष | व्यसन मुक्ती समिती |

संपर्क : मो 9607567449 / 9423447113 / 9923689676 / 8378825533/ 8856018840 / 8108337170 / 9011319236 / 9307231264 / 9665930456 / 9766776392 / 9403563360 / 973055306